Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १५३। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

धरणगावात पोळा साधेपणाने

(पान २ वर)



Selected

## पुन्हा लोकलचा जीवघेणा प्रवास!

मुंबई : मुंबईची लाईफलाईन म्हणून लोकलकडे पाहिलं जातं. मात्र मुंबईत सकाळच्या 'पीक अवर्स' (सकाळी ७.०० ते १०.००) दरम्यान लोकल ट्रेनचा विलंब, गर्दी या सर्व कारणांमुळे प्रवाशांना ऑफीसमधल्या लेटमार्कला सामोरे जावं लागत. विशेषतः मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेमार्गावर तांत्रिक बिघाड, पायाभूत सुविधांची सुरू असलेली कामे (जसे की फलाट विस्तार) आणि ऐन वेळेस रद्द होणाऱ्या फेऱ्यांमुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. याचदरम्यान आज मध्य रेल्वेवरील सकाळच्या गर्दीच्या वेळेत डोंबिवलीहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकलमध्ये धक्कादायक घटना घडली. स्थानकातून सकाळी 7.56 वाजता सुटलेल्या लोकलमधून दिवा-मुंब्रादरम्यान एक महिला प्रवासी थेट रेल्वे रुळावर पडली.

## निधीवाटप आणि सोशल मीडिया वादामुळे महायुतीतील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर

# अंगावर आलात तर...महायुतीत पुन्हा ठिणगी!

### शिवसेनेच्या इशाऱ्यानंतर भाजपचेही प्रत्युत्तर; वैयक्तिक टीका

जन सम्राट टाईम्स

**भंडारा। भंडारा जिल्ह्यात महायुतीतील शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. परस्परांवर होणारे आरोप-प्रत्यारोप, वैयक्तिक टीका, निधीवाटपातील कथित समन्वयाचा अभाव आणि सोशल मीडियावरील वक्तव्यांमुळे दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांमध्ये दुरावा वाढताना दिसत आहे. शिवसेनेने आपल्या नेत्यांवर आरोप झाल्यास तीव्र प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिल्यानंतर भाजपनेही आक्रमक भूमिका घेतल्याने जिल्ह्यातील महायुतीच्या राजकारणात पुन्हा ठिणगी पडली आहे.**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल गायधने यांनी महायुतीतील घटक पक्षांनी परस्परांमध्ये समन्वय ठेवण्याची गरज व्यक्त केली. मात्र, शिवसेनेच्या नेत्यांवर किंवा पदाधिकाऱ्यांवर सातत्याने आरोप केले गेले, तर शिवसेना गप्प बसणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. राजकीय आरोपांना राजकीय पद्धतीनेच उत्तर दिले जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी भाजपमध्ये गेलेल्या एका नेत्याचा संदर्भ देत गायधने यांनी भविष्यात भाजपला त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागू शकतात, असे सूचक वक्तव्य केले. त्यामुळे त्यांच्या या भूमिकेची जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चा सुरू



झाली आहे. महायुतीतील अंतर्गत मतभेद सार्वजनिक व्यासपीठावर येऊ लागल्याने आगामी राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होणार का, याकडेही लक्ष लागले आहे. भाजपकडूनही आक्रमक प्रत्युत्तर शिवसेनेच्या भूमिकेला प्रत्युत्तर देताना भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा युवा प्रमुख पेजल भुरे यांनी वैयक्तिक टीका आणि चारित्र्यहननाचे राजकारण टाळण्याचे आवाहन केले. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र, ते वैयक्तिक पातळीवर नेणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. भाजपचे कार्यकर्ते शांत आणि संयमी आहेत. मात्र, त्यांच्या संयमाची परीक्षा घेतली किंवा त्यांना आव्हान दिले, तर ते शांत बसणार नाहीत, असा इशाराही भुरे यांनी दिला. त्यामुळे शिवसेना-भाजपमधील संघर्षाला आता दोन्ही बाजूंनी आक्रमक स्वरूप येत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, भाजपच्या एका प्रवक्त्याने शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या कथित धमकावण्याच्या भाषेवर आक्षेप घेतला. महायुतीतील घटक पक्षांनी एकमेकांवर आरोप करण्याऐवजी संवाद आणि समन्वयातून प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. निधीवाटप आणि सोशल मीडिया वादही कारणीभूत महायुतीच्या माध्यमातून होणाऱ्या

### 'अंगावर आलात तर शिंगावर घेऊ'

शिवसेनेने आपल्या नेत्यांवर टीका झाल्यास प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिल्यानंतर भाजपनेही आपल्या नेत्यांवरील टीका खपवून घेतली जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे भंडारा जिल्ह्यात एकीकडे राज्य आणि केंद्र पातळीवर महायुतीची एकजूट कायम ठेवण्याचे प्रयत्न सुरू असताना स्थानिक पातळीवरील अशा आरोप-प्रत्यारोपांमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

निधीवाटपामध्ये स्थानिक पातळीवर अपेक्षित समन्वय नसल्याची टीकाही भाजपकडून करण्यात आली. विकासकामे, निधी आणि राजकीय श्रेय यावरून घटक पक्षांमध्ये मतभेद निर्माण होत असल्याचे संकेत या आरोपांतून मिळत आहेत.याशिवाय सोशल मीडियावरून एकमेकांवर टीका करण्याच्या प्रकारावरही भाजपने नाराजी व्यक्त केली. राजकीय मतभेद सोशल मीडिया आणि सार्वजनिक वक्तव्यांमधून अधिक तीव्र करण्याऐवजी महायुतीच्या चौकटीत चर्चा करून तोडगा काढण्याची गरज असल्याचे भाजपकडून सांगण्यात आले.

## भंडाऱ्यात भीषण अपघात! ट्रॅक्स अन् आयशर ट्रकच्या धडकेत 8 मजुरांचा घटनास्थळीच मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

**भंडारा । प्रतिनिधी:** भंडारा जिल्ह्यातून एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. भंडारा जिल्ह्याच्या लाखनी साकोली तालुक्याच्या पिंपळगावजवळ आयशर ट्रक आणि ट्रॅक्स गाडीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात 8 जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. अपघातातील सर्व मृतक हे छत्तीसगड राज्यातील मजूर असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, छत्तीसगडमधील काही मजूर ट्रॅक्स गाडीने नागपूरच्या दिशेने प्रवास करत होते. पिंपळगाव येथील एका पेट्रोल पंपावरून एक आयशर ट्रक रस्त्यावर निघत असताना, मागून येणाऱ्या ट्रॅक्स चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. भरधाव ट्रॅक्स थेट आयशर ट्रकवर जाऊन आदळली. ही धडक इतकी भीषण होती की ट्रॅक्स गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. या दुर्दैवी अपघातात ट्रॅक्समधील 8 जणांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नॅशनल हायवे पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. अपघातातील गंभीर जखमींना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे भंडारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

तर मिळालेल्या माहितीनुसार, मृतक हे सर्व छत्तीसगडचे मजूर आहेत, ते नागपूरच्या दिशेने जात असताना झाला हा भीषण अपघात पेट्रोल पंपावरून निघणाऱ्या आयशर ट्रकला पाठीमागून आलेल्या मजुरांच्या ट्रॅक्सने धडक दिल्याने ही घटना घडली आहे, तर प्राथमिक माहितीनुसार चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचं बोललं जात आहे. आठ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची



नॅशनल हायवे पोलिसांनी माहिती दिली आहे. उर्वरित गंभीर जखमींना भंडारा मेडिकल कॉलेजमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे. महामार्गावरील या भीषण अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक पूर्ववत केली. याप्रकरणी पोलिसांनी अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. भंडारा जिल्ह्यातून एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. भंडारा जिल्ह्याच्या लाखनी साकोली तालुक्याच्या पिंपळगावजवळ आयशर ट्रक आणि ट्रॅक्स गाडीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात 8 जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. अपघातातील सर्व मृतक हे छत्तीसगड राज्यातील मजूर असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, छत्तीसगडमधील काही मजूर ट्रॅक्स गाडीने नागपूरच्या दिशेने प्रवास करत होते. पिंपळगाव येथील एका पेट्रोल पंपावरून एक आयशर ट्रक रस्त्यावर निघत असताना, मागून येणाऱ्या ट्रॅक्स चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. भरधाव ट्रॅक्स थेट आयशर ट्रकवर जाऊन आदळली. ही धडक इतकी भीषण होती की ट्रॅक्स गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. या दुर्दैवी अपघातात ट्रॅक्समधील 8 जणांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नॅशनल हायवे पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. अपघातातील गंभीर जखमींना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे भंडारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

तर मिळालेल्या माहितीनुसार, मृतक हे सर्व छत्तीसगडचे मजूर आहेत, ते नागपूरच्या दिशेने जात असताना झाला हा भीषण अपघात पेट्रोल पंपावरून निघणाऱ्या आयशर ट्रकला पाठीमागून आलेल्या मजुरांच्या ट्रॅक्सने धडक दिल्याने ही घटना घडली आहे, तर प्राथमिक माहितीनुसार चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचं बोललं जात आहे.

## पुण्याच्या विकासाला 'स्पीड'! सुनेत्रा पवारांचा PMRDAला थेट आदेश


जन सम्राट टाईम्स

**मुंबई |प्रतिनिधी:** पुणे जिल्ह्याच्या नियोजित व सर्वांगीण विकासामध्ये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, पीएमआरडीए क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज दिले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पीएमआरडीए क्षेत्रातील विविध विकासकामांचा आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतला. यावेळी पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विविध प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सह आयुक्त रुपाली आवले-डंबे, सह आयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, प्रभारी सह आयुक्त (अनधिकृत बांधकाम) हिम्मत खराडे, महानगर नियोजनकार स्मिता कलकुटकी, मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विशेष प्रकल्प रिनाज पठाण, प्रभारी मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी यांच्यासह पीएमआरडीएचे संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते.पमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात ६७४ गावांचा समावेश असून, सुमारे ५,२१५ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. पुणे महानगर प्रदेशाचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पर्यटनाच्या वाढत्या संधी लक्षात घेऊन पुढील अनेक वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करावे.

## 18 वी ब्रिक्स परिषदेसाठी पुतीन भारतात दाखल

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** 18 वी ब्रिक्स परिषद भारतात पार पडणार आहे. 12 आणि 13 सप्टेंबरला राजधानी दिल्लीत परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. 'भारत मंडपम' इथं जय्यत तयारी करण्यात आली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारतात दाखल झाले. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंगही भारतात येणार आहेत. जागतिक राजकारणातील बदलते सत्तासमीकरण, अमेरिका-चीन व्यापार आणि सामरिक तणाव, युक्रेन युद्ध तसेच 'ग्लोबल साऊथ'च्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर 18वी 'ब्रिक्स शिखर परिषद' अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तसंच जागतिक महासत्ताचे नेते भारतात येणार असल्यानं राजधानी दिल्लीला छावणीचं स्वरुप आलं आहे. ब्रिक्स परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग भारतात येणार आहेत. सब्बल सात वर्षांनंतर जिनपिंग भारतात येणार आहेत. रशियाचे अध्यक्ष पुतीनही ब्रिक्स परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. तर इराणचे अध्यक्ष पेजेश्कियनही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. ब्रिक्सच्या निमित्ताने मोदी - जिनपिंग - पुतीन - पेजेश्कियन एकत्र एका व्यासपीठावर दिसतील.



विशेष म्हणजे रशिया, चीन, भारत, इराण या चारही देशांचा सध्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्याशी या ना त्या स्वरूपाचा संघर्ष सुरू आहे. 12 आणि 13 तारखेला ब्रिक्स परिषद नवी दिल्लीत भारत मंडपम इथे होणार आहे. जिनपिंग यांच्या भारत दौऱ्यामुळे दोन्ही देशातील राजनैतिक संबंधांतील सुधारणांना चालना मिळेल. मात्र दोन्ही देशांमधील व्यावसायिक आणि आर्थिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने अजून फारशी सकारात्मक चिन्हं दिसत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची यापूर्वीची भेट 31 ऑगस्ट रोजी बिश्केक येथे झालेल्या SCO शिखर परिषदेदरम्यान झाली होती. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी भारत-रशिया यांच्यातील राजकीय, आर्थिक, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ तसेच नागरिकांमधील संपर्कासह विविध क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेतला होताहोता. आता दिल्लीत होणाऱ्या चर्चेत संरक्षण सहकार्यावर विशेष लक्ष असण्याची शक्यता आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या संभाव्य अपग्रेडसह रशियाकडून मिळणाऱ्या S-400 प्रणालींच्या उर्वरित पुरवठ्यावर आणि Su-57 लढाऊ विमानासंदर्भातील प्रस्तावांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## बुलढाण्यात सापडले पुरातन बुद्धमूर्तींचे अवशेष; थेट 'अशोक सम्राट'शी कनेक्शन?

### दगडी अवशेष आणि मातीच्या भांड्यांनंतर बुद्धमूर्तींच्या अवशेषाने पुरातत्त्वीय कुतूहल वाढले

जन सम्राट टाईम्स

**बुलढाणा|प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील ऐतिहासिक चांडोळ गाव पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. या परिसरात पुरातन बुद्धमूर्तींचे अवशेष आढळल्याची माहिती समोर आली असून, हे अवशेष सम्राट अशोकाच्या काळाशी संबंधित असल्याचा दावा केला जात आहे. या दाव्यामुळे चांडोळच्या प्राचीन इतिहासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मात्र, या अवशेषांचे नेमके कालखंड, स्वरूप आणि ऐतिहासिक महत्त्व निश्चित करण्यासाठी अधिकृत पुरातत्त्वीय तपासणी होणे आवश्यक आहे. बुद्धमूर्तींच्या अवशेषांमुळे चांडोळ परिसरात प्राचीन काळात बौद्ध भिक्खूंचे वास्तव्य होते का, तसेच या भागातून बौद्ध धम्माचा प्रसार झाला होता का, याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे या अवशेषांकडे केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक दृष्टिकोनातून नव्हे, तर पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक दृष्टीनेही पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

प्राचीन व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण चांडोळ परिसराचा प्राचीन इतिहास आणि व्यापारी मार्गांशी असलेले संबंध यामुळे या शोधाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पैठण, भोकरदन, चांडोळ आणि अजिंठा घाटाला जोडणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गावर या भागाचे स्थान असल्याचे सांगितले जाते. या मार्गावरून व्यापारी तांडे



तसेच भिक्खू संघांची ये-जा होत असल्याची ऐतिहासिक शक्यता व्यक्त केली जाते. प्राचीन काळात व्यापारी मार्ग हे केवळ व्यापाराचे केंद्र नसून विविध संस्कृती, विचार आणि धार्मिक परंपरांच्या प्रसाराचेही माध्यम होते. त्यामुळे चांडोळ परिसरात बौद्ध अवशेष आढळल्याचा दावा या ऐतिहासिक पार्श्वभूमीशी जोडला जात आहे. जुन्या अवशेषांमुळे कुतूहल वाढले चांडोळ परिसरात यापूर्वीही जुन्या विटा, दगडी अवशेष आणि मातीची भांडी आढळत असल्याचे सांगितले जाते. आता त्यात बुद्धमूर्तींच्या अवशेषांची भर पडल्याने परिसराच्या पुरातत्त्वीय महत्त्वाबाबत उत्सुकता वाढली आहे.

मात्र, एखाद्या अवशेषावरून त्याचा कालखंड किंवा तो थेट सम्राट अशोकाच्या काळातील असल्याचे निश्चित करता येत नाही.

त्यासाठी मूर्तींची शैली, दगडाचा प्रकार, शिल्पकला, अवशेषांचे पुरातत्त्वीय स्तर, परिसरातील इतर वास्तू आणि उपलब्ध पुराव्यांचा शास्त्रीय अभ्यास आवश्यक ठरतो. अधिकृत तपासणीनंतरच इतिहास स्पष्ट होणार बुद्धमूर्तींच्या अवशेषांची पुरातत्त्व विभागाकडून शास्त्रीय पद्धतीने तपासणी झाल्यास चांडोळच्या प्राचीन इतिहासातील अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. या परिसरात बौद्ध विहार, चैत्य, स्तूप किंवा भिक्खूंच्या वास्तव्याशी संबंधित अन्य पुरावे आहेत का, याचाही शोध घेता येऊ शकतो. सध्या बुद्धमूर्तींच्या अवशेषांच्या छायाचित्रांमुळे हा विषय चर्चेत आला आहे. मात्र, 'अशोककालीन' असल्याचा दावा अधिकृत पुरातत्त्वीय तपासणीअंतीच निश्चित होऊ शकतो. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या अवशेषांची तातडीने पाहणी करून शास्त्रीय उत्खनन व संशोधन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. चांडोळच्या मातीत दडलेला हा इतिहास प्रत्यक्षात किती जुना आहे आणि त्याचा बौद्ध धम्माच्या प्रसाराशी किती संबंध आहे, याचे उत्तर पुरातत्त्वीय संशोधनातूनच समोर येणार आहे. त्यामुळे आता चांडोळच्या या संभाव्य ऐतिहासिक शोधाकडे इतिहासप्रेमी आणि पुरातत्त्व अभ्यासकांचे लक्ष लागले आहे.

## कल्याणच्या कुख्यात जालीम गँगवर मोक्का

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी:** काही दिवसांपूर्वी कुख्यात ड्रग्ज तस्कर अमजद पठाण, काशिम वसईकर, कृष्णा हालेमणी, गणेश मुथू स्वामी आणि सद्दाम शेख यांना पोलिसांनी अटक केली होती. या कारवाईदरम्यान कल्याण पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त केले होते. या कारवाईत सुमारे 34 कोटी रुपयांचा drugs हस्तगत करण्यात आल्याची माहिती आहे. ही टोळी राज्यभरात 'जालीम गँग' या नावाने ओळखली जाते. अमजद पठाण याच्यावर केवळ ड्रग्ज तस्करीचेच नव्हे, तर हत्या, हत्येचे प्रयत्न अथवा वसुलीचा प्रयत्न, अपहरण यांसह इतर गंभीर गुन्ह्यांचेही आरोप आहेत.

संघटित पद्धतीने गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या या टोळीवर लगाम घालण्यासाठी कल्याण पोलिसांनी मोक्का कायद्याचा वापर केला आहे. या कारवाईमुळे कल्याण परिसरातील संघटित गुन्हेगारीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. कल्याण डीसीपी अतुल झेंडे,एसीपी अशोक होंनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाच्या तपास सुरू आहे.

ड्रग्स तस्कर अमजद पठाण याला अटक करण्यामध्ये डीसीपी स्कॉर्ड प्रमुख अनिल गायकवाड यांची महत्त्वाची भूमिका मानली जात आहे. मात्र अमजद पठाण याची शूटिंग करताना पत्रकारांना धमकवायच्या प्रयत्न अमजद पठाण यांनी केला आहे या प्रकरणात देखील पोलिसांनी ठोस कारवाई केली पाहिजे अशी मागणी पत्रकार संघटनेने केली आहे. काही दिवसांपूर्वी कुख्यात ड्रग्ज तस्कर अमजद पठाण, काशिम वसईकर, कृष्णा हालेमणी, गणेश मुथू स्वामी आणि सद्दाम शेख यांना पोलिसांनी अटक केली होती.

# भडगावात संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात; भव्य पालखी मिरवणुकीने शहर दुमदुमले!

## एकजुटीतून उभे राहिले मंदिर आणि नवनिर्मित सभागृह; युवा नेते सुमित पाटील यांच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी :** शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भडगावातील नाभिक समाजात भक्ती, उत्साह आणि सामाजिक एकजुटीचे दर्शन घडले. श्री संत सेना महाराज नाभिक समाज विकास मंडळाच्या वतीने विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून पुण्यतिथी मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते समाजबांधवांच्या एकजुटीतून आणि आर्थिक योगदानातून उभारण्यात आलेल्या नवनिर्मित नाभिक समाज सभागृहाचे लोकार्पण. पाचोरा नगरपरिषद गटनेते तथा आमदार किशोर पाटील यांचे सुपुत्र युवा नेते सुमित पाटील यांच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. समाजाच्या वर्गणीतून उभारली वास्तू नवनिर्मित मंदिर आणि सभागृहाची उभारणी ही केवळ बांधकामाची बाब नसून नाभिक समाजाची अस्मिता, स्वाभिमान, आत्मनिर्भरता आणि संघटित शक्तीचे प्रतीक ठरली आहे. समाजबांधवांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या क्षमतेनुसार आर्थिक योगदान दिले. अनेकांनी नियमित वर्गणी जमा केली, तर काहींनी बांधकाम साहित्य, श्रमदान आणि विविध स्वरूपात मदत



केली. विशेष म्हणजे कोणत्याही शासकीय योजनेचा आधार न घेता सामूहिक योगदानातून मंदिर आणि सभागृह उभारण्यात आले. त्यामुळे ही वास्तू केवळ चार भिंतींची इमारत न राहता समाजाच्या एकजुटीचे, स्वाभिमानाचे, त्यागाचे आणि आर्थिक शिस्तीचे जिवंत प्रतीक बनली आहे. संत सेना महाराजांच्या प्रतिमेची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाची सुरुवात ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री संत सेना महाराज व विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात संत सेना महाराजांच्या प्रतिमेच्या प्राणप्रतिष्ठेने झाली. मंडळाचे अध्यक्ष संजय पवार यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. नवनिर्मित सभागृहाच्या वास्तुशांतीनिमित्त सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. रात्री श्रीराम भजनी मंडळाच्या भक्तिमय भजनांनी वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. पालखी मिरवणुकीने शहर दुमदुमले ८ सप्टेंबर रोजी सकाळी मंदिर परिसरातून संत सेना महाराजांच्या प्रतिमेची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

भक्तिमय जयघोष, ढोल-ताशांचा गजर आणि समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पालखी मिरवणूक शिवाजीनगर, शिवशक्ती कॉलनी, बाळद रोड, बसस्थानक परिसर, मेन रोड आणि पाचोरा रोड मार्गे मार्गक्रमण करीत पुन्हा मंदिर परिसरात पोहोचली. विविध ठिकाणी नागरिकांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी चर्मकार संघाचे तालुकाध्यक्ष रविंद्र अहिरे, शिवदास महाजन, नितीन महाजन तसेच आरोग्य निरीक्षक संजय सोनार यांच्यासह विविध मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेतले. 'एकजुटीने काम केल्यास समाजाची प्रगती निश्चित' — सुमित पाटील पालखी मिरवणुकीनंतर झालेल्या कार्यक्रमात युवा नेते सुमित पाटील यांनी समाजबांधवांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "समाजाने एकजुटीने कार्य केल्यास समाजाची प्रगती निश्चित होते. नाभिक समाजाचे पाठबळ नेहमीच आमदार किशोर पाटील यांच्या पाठीशी राहिले आहे. भविष्यातही समाजाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू." माजी नगराध्यक्ष प्रशांत पवार यांनीही मनोगत व्यक्त करत समाजातील एकजूट, परस्पर सहकार्य आणि सामाजिक विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज व्यक्त केली. समाजाच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी सभागृहाचा उपयोग नवनिर्मित सभागृहाचा उपयोग केवळ सामाजिक किंवा कौटुंबिक कार्यक्रमांसाठी न करता भविष्यात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन, आरोग्यविषयक उपक्रम, रोजगार मार्गदर्शन, गरजू कुटुंबांना मदत आणि विविध समाजोपयोगी कार्यक्रमांसाठी करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. समाजातील गुणवंत विद्यार्थी, युवक, महिला आणि गरजू घटकांना एकत्र आणून त्यांच्या विकासासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची दिशा या सभागृहामुळे मिळणार आहे.

---

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

## धरणगावात पोळा साधेपणाने

### पावसातील खंडामुळे शेतकरी संकटात



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव| प्रतिनिधी :** यंदा पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि पावसातील मोठ्या खंडामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर धरणगाव शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख भागवत चौधरी यांनी पोळा सण साधेपणाने साजरा करून शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. पोळ्यानिमित्त बैलांना पारंपरिक पद्धतीने सजविण्यात आले होते. मात्र यावेळी बैलांच्या अंगावर 'दुष्काळ जाहीर करा' अशा आशयाचे फलक लावण्यात आले. शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती आणि पावसाअभावी निर्माण झालेली संकटाची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हा उपक्रम करण्यात आला. पावसाच्या खंडामुळे खरीप पिके संकटात पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला असून शेतकऱ्यांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने सध्याच्या पावसाच्या परिस्थितीचे तातडीने मूल्यांकन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भागवत चौधरी यांनी केली. पुढील रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याची उपलब्धता, दुष्काळसदृश परिस्थितीतील उपाययोजना आणि शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक व प्रशासकीय मदत मिळावी, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. उत्सवापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य पोळा हा शेतकरी आणि बैलांच्या जिव्हाळ्याच्या नात्याचा सण आहे. मात्र यंदाची प्रतिकूल परिस्थिती लक्षात घेता अनावश्यक खर्च आणि दिखावा टाळून साधेपणाने पोळा साजरा करण्यात आला. बैलांच्या अंगावर लावण्यात आलेल्या 'दुष्काळ जाहीर करा'च्या फलकातून शेतकऱ्यांची व्यथा, पाण्याची गरज आणि शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यंदाचा पोळा सण साधेपणाने साजरा करताना शेतकऱ्यांच्या प्रश्नाला प्राधान्य देण्याचा संदेश धरणगावातून देण्यात आला. यंदा पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि पावसातील मोठ्या खंडामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर धरणगाव शहरात शिवसेना पक्षाचे शहरप्रमुख भागवत चौधरी यांनी पोळा सण साधेपणाने साजरा करून शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. पोळ्यानिमित्त बैलांना पारंपरिक पद्धतीने सजविण्यात आले होते. शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती आणि पावसाअभावी निर्माण झालेली संकटाची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हा उपक्रम करण्यात आला.

---

## जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत स्कूल ऑफ स्कॉलर्सचे वर्चस्व!

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर। प्रतिनिधी:** तालुका क्रीडा संकुल, मलकापूर येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेत स्कूल ऑफ स्कॉलर्स, मलकापूरच्या खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करत पाचही गटांत विजेतेपद पटकावले. या दमदार कामगिरीमुळे शाळेने जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रातील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा तसेच सॉफ्टबॉल संघटना, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पाचही गटांत विजयी झेप या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांच्या मुला-मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या संघांनी १४ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुली, १७ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुली आणि १९ वर्षांखालील मुले अशा पाचही गटांत विजेतेपद मिळविले. विशेष म्हणजे १४ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या संघाने नूतन इंग्लिश



स्कूलच्या संघाचा सहा धावांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. अमरावती विभागीय स्पर्धेत बुलढाण्याचे प्रतिनिधित्व पाचही विजयी संघांची अमरावती विभागीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे आगामी विभागीय स्पर्धेत स्कूल ऑफ स्कॉलर्सचे खेळाडू बुलढाणा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. जिल्हास्तरावर मिळवलेल्या यशानंतर आता विभागीय स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्यासाठी खेळाडू सज्ज झाले आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रीडा संकुलचे केअरटेकर तथा अध्यक्ष छत्रपती शिवाजी चंद्रकांत साळुंके, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती उज्वला लांडगे तसेच चिखली संघाचे क्रीडाशिक्षक श्री. काटे सर यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. आयोजनासाठी विशेष परिश्रम स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बुलढाणा सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त शेषनारायण लोढे सर, स्कूल ऑफ स्कॉलर्सचे क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल साळुंके आणि क्रीडा शिक्षक मनीष उमाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. पंच म्हणून विद्यापीठ खेळाडू अथर्व सराफ, तर गुणलेखक म्हणून समीर शेख यांनी जबाबदारी पार पाडली. या स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती भक्ती आंब्रे व राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती उज्वला लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडल्या.

---

## विभागीय परीक्षेतील यशाच्या जोरावर रोहित वाडेकर यांची पदोन्नती

### धुळे सुपुत्राची मुंबईत गरुड भरारी

जन सम्राट टाईम्स

**धुळे / मुंबई। प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्याचे सुपुत्र रोहित अशोक वाडेकर यांनी मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विलेपार्ले पश्चिम येथे पोस्टमन म्हणून प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना त्यांनी विभागीय परीक्षा (LDCE) मध्ये यश मिळवत पोस्टल असिस्टंट (Postal Assistant) पदावर पदोन्नती मिळवली आहे. मूळचे धुळे येथील असलेले रोहित वाडेकर यांनी आपल्या नोकरीच्या प्रवासाची सुरुवात पोस्टमन या पदापासून केली. फिल्डमध्ये प्रत्यक्ष नागरिकांशी संपर्क साधत सेवा बजावत असताना त्यांनी प्रशासकीय क्षेत्रात पुढे जाण्याचे ध्येय ठेवले. त्यासाठी विभागीय परीक्षेची तयारी करत त्यांनी यश संपादन केले. फिल्डमधून प्रशासकीय कार्यालयात भरारी पोस्टमनसारख्या फिल्डच्या नोकरीतून मुंबईतील रिजनल ऑफिसमध्ये पोस्टल असिस्टंट म्हणून जबाबदारी स्वीकारणे,




ही त्यांच्या मेहनतीची आणि जिद्दीची पावती मानली जात आहे. नोकरी सांभाळत अभ्यास करून विभागीय परीक्षेत यश मिळविणे अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही सातत्याने प्रयत्न केल्यास प्रगतीची नवी दारे खुली होऊ शकतात, हे वाडेकर यांच्या प्रवासातून दिसून येते. पोस्टल परिवारातून अभिनंदनाचा वर्षाव रोहित वाडेकर यांच्या पदोन्नतीबद्दल धुळे आणि मुंबईतील पोस्टल परिवारातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांचे जवळचे मित्र तथा बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षक श्री. विजयकुमार पाटील यांनी वाडेकर यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. रोहित वाडेकर यांच्या या यशामुळे धुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या संघर्षमय प्रवासातून अनेक तरुणांना प्रेरणा मिळणार आहे. धुळे जिल्ह्याचे सुपुत्र रोहित अशोक वाडेकर यांनी मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विलेपार्ले पश्चिम येथे पोस्टमन म्हणून प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना त्यांनी विभागीय परीक्षा पदावर पदोन्नती मिळवली आहे. मूळचे धुळे येथील असलेले रोहित वाडेकर यांनी आपल्या नोकरीच्या प्रवासाची सुरुवात पोस्टमन या पदापासून केली. फिल्डमध्ये प्रत्यक्ष नागरिकांशी संपर्क साधत सेवा बजावत असताना त्यांनी प्रशासकीय क्षेत्रात पुढे जाण्याचे ध्येय ठेवले. त्यासाठी विभागीय परीक्षेची तयारी करत त्यांनी यश संपादन केले. फिल्डमधून प्रशासकीय कार्यालयात भरारी पोस्टमनसारख्या फिल्डच्या नोकरीतून मुंबईतील रिजनल ऑफिसमध्ये पोस्टल असिस्टंट म्हणून जबाबदारी स्वीकारणे, ही त्यांच्या मेहनतीची आणि जिद्दीची पावती मानली जात आहे.

---

## वाळकीतील युवकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

जन सम्राट टाईम्स

**चोपडा। प्रतिनिधी:** चोपडा तालुक्यातील वाळकी गावातील असंख्य युवकांनी आमदार प्रा. अण्णासाहेब चंद्रकांत बळीराम सोनवणे आणि लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

आमदार चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते या युवकांचा पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी पक्षात प्रवेश करणाऱ्या युवकांनी वाळकी गावात आमदार चंद्रकांत सोनवणे यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकासकामांचे कौतुक केले. गावाच्या विकासाला चालना देण्यासाठी तसेच भविष्यातही विकासकामे सुरू राहावीत, या अपेक्षेने युवकांनी शिवसेनेत प्रवेश केल्याचे सांगितले. विकासकामांवर विश्वास व्यक्त आमदार चंद्रकांत सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत वाळकी गावातील युवकांनी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केल्याने स्थानिक पातळीवर पक्षाला बळ मिळाल्याचे मानले जात आहे. गावाच्या विकासासाठी युवकांनी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी काळात गावातील विविध प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांसाठी पक्षाच्या माध्यमातून सक्रिय भूमिका घेणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या युकांचा शिवसेनेत प्रवेश शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये हर्षल पाटील, कुणाल पाटील, कुणाल सुनील पाटील, प्रेम बाविस्कर, तेजस कोळी, गणेश दिवर, नयन पाटील, रोहित दिवर, हर्षल कोळी, वैभव पाटील, पंकज पाटील, समाधान दिवर आणि देवेश पाटील यांच्यासह अनेक युवकांचा समावेश आहे. वाळकीतील युवकांच्या या पक्षप्रवेशामुळे चोपडा तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

---

## ममुराबाद येथे बैलपोळा उत्साहात; चौधरींच्या बैलांची आकर्षक सजावट



जन सम्राट टाईम्स

**ममुराबाद| प्रतिनिधी:** शेतकऱ्यांचा पाठीराखा आणि वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा पारंपरिक सण बैलपोळा ममुराबाद येथे मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. पोळ्यानिमित्त गावातील बळीराजाने आपल्या लाडक्या बैलांना सजवून त्यांची पूजा-अर्चा केली.

या उत्सवात ममुराबाद येथील शेतकरी सुशील उमाकांत चौधरी यांनी आपल्या बैलांची केलेली आकर्षक सजावट विशेष लक्षवेधी ठरली.

त्यांनी बैलांच्या शिंगांना रंग लावून त्यावर मोरपिसे आणि रंगीबेरंगी बाशिंगे सजवली होती. गळ्यात कवड्यांच्या माळा, तर पाठीवर रंगीबेरंगी झूल पांघरल्याने सर्जा-राजाचे रूप अधिकच खुलून दिसत होते. वर्षभराच्या कष्टांची पोळ्याच्या दिवशी कृतज्ञतेने परतफेड वर्षाचे ३६५ दिवस शेतात शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या बैलांची पोळ्याच्या दिवशी विशेष पूजा करण्यात आली. सुशील चौधरी यांनी आपल्या बैलांची निगा राखत त्यांची विधिवत पूजा करून गोडधोडाचा नैवेद्य दाखवला. शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते पोळ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले. गावात मिरवणुकीने उत्साहाला उधाण बैलपोळ्यानिमित्त गावात ठिकठिकाणी सजवलेल्या बैलांच्या मिरवणुका काढण्यात आल्या.

रंगीबेरंगी सजावटीतील बैलजोड्या पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली. सर्जा-राजाच्या सजावटीने आणि पोळ्याच्या उत्साहाने संपूर्ण ममुराबादमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शेतकरी आणि पशुधनातील प्रेम, कृतज्ञता आणि जिव्हाळ्याची परंपरा जपत ममुराबादचा बैलपोळा उत्साहात पार पडला.

---

## टाकरखेडा गावात सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती

### डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर,फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जनजागृती

जन सम्राट टाईम्स

**टाकरखेडा। प्रतिनिधी :** डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढत असलेल्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (KBCNMU), जळगाव आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने टाकरखेडा येथे सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नागरिकांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, संशयास्पद फोन कॉल, मेसेज, लिंक तसेच ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास घाबरून न जाता तातडीने कोणती पावले उचलावीत, याची माहितीही नागरिकांना देण्यात आली. डिजिटल व्यवहार करताना वैयक्तिक व बँकिंग माहिती कोणालाही शेअर करू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि संशयास्पद संदेश अथवा फोन कॉलला प्रतिसाद देण्यापूर्वी योग्य ती खात्री करावी, असे आवाहन यावेळी करण्यात



आले. स्वतःसोबतच कुटुंबातील सदस्यांनाही सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्याचे आवाहन करण्यात आले. या जनजागृती उपक्रमात स्नेहल पाटील, वैष्णवी पाटील, जय ठाकूर आणि राहुल चोपडे यांनी सक्रिय सहभाग घेत नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी डॉ. आर. बी. आमले यांचे मार्गदर्शन लाभले. गावातील नागरिकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी आवश्यक माहिती जाणून घेतली. डिजिटल युगात सुरक्षित ऑनलाइन व्यवहारांसाठी अशा जनजागृती उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढत असलेल्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (KBCNMU), जळगाव आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने टाकरखेडा येथे सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नागरिकांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, संशयास्पद फोन कॉल, मेसेज, लिंक तसेच ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत सविस्तर वैयक्तिक व बँकिंग माहिती कोणालाही शेअर करू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि संशयास्पद संदेश अथवा फोन कॉलला प्रतिसाद देण्यापूर्वी योग्य ती खात्री करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# स्पेलिंग बी स्पर्धेत काहूरखेडे शाळेचे सहा विद्यार्थी चमकले; तीन विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** जिल्हा परिषद जळगाव यांच्या वतीने विनोबा ॲपच्या माध्यमातून आयोजित शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हा अशा चारस्तरीय स्पेलिंग बी (Spelling Bee) स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काहूरखेडे, ता. भुसावळ येथील सहा विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. विशेष म्हणजे या सहा विद्यार्थ्यांपैकी गायत्री अलकेश पाटील, श्रद्धा ज्ञानेश्वर पाटील आणि चैताली विकास पाटील या तीन विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा परिषद जळगाव यांच्या वतीने विनोबा ॲपच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचा पहिला टप्पा केंद्रस्तरावर पार पडला. जिल्हा परिषद केंद्र शाळा वरणगाव येथे झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी तुषार प्रधान आणि केंद्रप्रमुख राजेश पाटील यांच्या हस्ते झाले. “Let the Best Speller Win” आणि “Think, Spell, Succeed” या ब्रीदवाक्यांना सार्थ ठरवत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने स्पर्धेत सहभाग घेतला. काहूरखेडेच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी केंद्रस्तरीय स्पर्धेच्या अंतिम निकालात काहूरखेडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. गट १ (इयत्ता १ ली व २ री) — गायत्री अलकेश पाटील प्रथम, हर्षद नीलेश हटकर तृतीय. गट २ (इयत्ता ३ री व ४ थी) — श्रद्धा ज्ञानेश्वर पाटील प्रथम, आरुषी उमेश पाटील तृतीय. गट ३ (इयत्ता ५ वी व ६ वी) —



चैताली विकास पाटील द्वितीय, किर्ती ज्ञानेश्वर पाटील तृतीय. अशा प्रकारे काहूरखेडे शाळेच्या सहा विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत अव्वल कामगिरी करत शाळेच्या यशात भर घातली. इतर शाळांतील विद्यार्थ्यांचीही चमकदार कामगिरी केंद्रस्तरीय स्पर्धेत इतर शाळांतील विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. गट १ प्रथम — गायत्री अलकेश पाटील, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे द्वितीय — भावना दिपक बावस्कर, जि. प. प्रा. शा. अंजनसोंडे तृतीय — हर्षद नीलेश हटकर, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे गट २ प्रथम — श्रद्धा ज्ञानेश्वर पाटील, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे द्वितीय — आकांक्षा प्रमोद सुरवाडे, जि. प. प्रा. शा. हतनूर तृतीय — आरुषी उमेश पाटील, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे गट ३ प्रथम — दिक्षा राजेंद्र धनगर, जि. प. प्रा. शा. टहाकळी द्वितीय — चैताली विकास पाटील, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे तृतीय — किर्ती ज्ञानेश्वर पाटील, जि. प. प्रा. शा. काहूरखेडे गट ४ प्रथम — ओम प्रवीण पाटील, जि. प. प्रा. शा. टहाकळी द्वितीय — पार्थ राजेंद्र महाजन, जि. प. प्रा. शा. टहाकळी तृतीय — पलक विशाल तायडे, जि. प. प्रा. शा. सिद्धेश्वर वरणगाव केंद्रस्तरीय स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवणारे विद्यार्थी तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. त्यानुसार काहूरखेडे शाळेच्या गायत्री अलकेश पाटील, श्रद्धा ज्ञानेश्वर पाटील आणि चैताली विकास पाटील यांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नियोजनासाठी शिक्षकांचे मोलाचे योगदान स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून ए. के. इंगळे सर (जी. एस. विद्यालय, वरणगाव) आणि एच. एस. पाटील सर (महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव) यांनी अचूक व पारदर्शक मूल्यमापन केले. उषा तडवी मॅडम यांनी वर्ग व्यवस्थापनाची जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. भूषण देशमुख सर यांनी तांत्रिक सहाय्य केले, तर समाधान जाधव सर यांनी ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन करत कार्यक्रमात रंगत आणली. विलास सूर्यवंशी सर यांनी स्पर्धेच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. ज्योती बेलसरे मॅडम यांनी आकर्षक व सर्जनशील फलक लेखन आणि रेखाटन करून कार्यक्रमस्थळाची शोभा वाढवली. शिक्षण विस्तार अधिकारी तुषार प्रधान यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रेरणा दिली. विविध शाळांमधून उपस्थित मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच केंद्र शाळेतील सहकारी शिक्षकांच्या सहकार्यामुळे स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व बालस्पर्धकांच्या मेहनतीचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करण्यात आले. विशेषतः काहूरखेडे शाळेच्या सहा विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक, पालक आणि शाळेचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या गायत्री अलकेश पाटील, श्रद्धा ज्ञानेश्वर पाटील आणि चैताली विकास पाटील यांना पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## पोळ्याच्या दिवशी पळासखेडे येथे तरुणाचा खून!

जन सम्राट टाईम्स



**पारोळा | प्रतिनिधी :** पोळ्याच्या दिवशीच पारोळा तालुक्यातील पळासखेडे बु. येथे किरकोळ वादातून १८ वर्षीय विद्यार्थ्याचा चाकूने हल्ला करून खून झाल्याची घटना घडली. मयुर दुर्वास पाटील (वय १८) असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणी अंकुश नेहरू पाटील, रा. पळासखेडे बु. याच्याविरुद्ध पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेच्या सुमारास पळासखेडे बु. शिवारातील रविंद्र सुकदेव पाटील यांच्या शेताजवळ घडली. मागील भांडणाच्या कारणावरून मयुर पाटील आणि आरोपी अंकुश पाटील यांच्यात वाद झाला. समजावण्याचा प्रयत्न सुरू असतानाच हल्ला फिर्यादी बाळू उर्फ दुर्वास भिका पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मयुर हा आपल्या चुलत भावासोबत शेताकडून गावाकडे येत होता. यावेळी त्याचा अंकुश पाटील याच्यासोबत वाद झाला. भांडण सुरू असल्याचे पाहून गावातील काही नागरिकांसह फिर्यादीने दोघांना समजावण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपीने पँटच्या खिशातून चाकू काढून मयुरच्या पोटात वार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. हल्ल्यानंतर मयुर गंभीर जखमी झाला. आरोपी घटनास्थळावरून पळून गेल्याचेही तक्रारीत नमूद आहे. रुग्णालयात नेले; वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले गंभीर जखमी झालेल्या मयुरला कुटीर रुग्णालय, पारोळा येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. मयुर पाटील हा किसान कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.ए.चे शिक्षण घेत होता, अशी माहिती त्याच्या वडिलांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत नमूद केली आहे. पारोळा पोलिसांत गुन्हा दाखल या घटनेप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३४१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम १०३(१), ११५(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दीपक पाटील करीत आहेत. गुन्ह्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आली असून, प्रथम खबर न्यायालयाकडे पाठविण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. आरोपीच्या अटकेच्या मागणीवर नातेवाईक ठाम दरम्यान, जोपर्यंत आरोपीला अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका मयुरच्या आई-वडिलांसह नातेवाईकांनी घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांकडून आरोपीविरोधात पुढील कायदेशीर कारवाई कधी आणि कशी केली जाते, याकडे पळासखेडे बु. ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे पोळ्याच्या उत्सवी वातावरणावर शोककळा पसरली असून, गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

## पहाण गावचा बैलपोळा उत्साहात!

जन सम्राट टाईम्स



**पहाण । प्रतिनिधी:** शेतकरी बांधवांचा जिव्हाळ्याचा आणि कृतज्ञतेचा सण असलेला बैलपोळा पहाण येथे मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. पोळ्यानिमित्त गावातील शेतकरी बांधवांनी आपल्या बैलजोड्यांना आकर्षक पद्धतीने सजवत पारंपरिक उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण केले. पोळ्याच्या आदल्या दिवशी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना नदीवर नेऊन स्वच्छ धुऊन त्यांची निगा राखली. पोळ्याच्या दिवशी सकाळपासूनच बैलजोड्यांना रंगरंगोटी करण्यात आली. बैलांच्या शिंगांना बेगड लावण्यात आले, गळ्यात घुंगरांच्या माळा, नवी वेसण आणि आकर्षक झुली घालून त्यांना सजवण्यात आले. राम मंदिर परिसरात सामूहिक पूजन दुपारी गावातील राम मंदिर परिसरात सर्व बैलजोड्यांचे सामूहिक पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पोलीस पाटील कल्पना महाजन, सरपंच छायाबाई पाटील यांच्यासह गावातील बहुसंख्य शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालत वर्षभर शेतात राबणाऱ्या या मुक्या जीवांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मानाच्या बैलजोडीचा विशेष सन्मान यावर्षी गावचा ‘मानाचा बैल’ म्हणून पोलीस पाटील सौ. कल्पना पंडित महाजन आणि सरपंच सौ. छायाबाई वाल्मीक पाटील यांच्या बैलजोडीला मान देण्यात आला. या दोन्ही मानाच्या बैलजोड्यांचे ग्रामपंचायतीच्या वतीने विधिवत पूजन करून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थितांनी मानाच्या बैलजोड्यांचे कौतुक केले. सायंकाळी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना घरी घेऊन जाऊन त्यांचे औक्षण केले. वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलांप्रती प्रेम, जिव्हाळा आणि कृतज्ञता व्यक्त करत पोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. ‘बैल हा शेतकऱ्याचा खरा मित्र’ यावेळी गावातील एका शेतकऱ्याने भावना व्यक्त करताना सांगितले, “बैल हा शेतकऱ्याचा खरा मित्र आहे. वर्षभर तो शेतात राबतो, म्हणून त्याच्याबद्दल कृतज्ञता म्हणून आम्ही पोळा सण साजरा करतो.” गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडूनही चोख खबरदारी घेण्यात आली. एकूणच, पहाण गावचा बैलपोळा उत्साह, जल्लोष आणि पारंपरिक परंपरा जपत आनंदात पार पडला. शेतकरी आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण गावात पोळ्याचा उत्साह पाहायला मिळाला.

## ‘अतिक्रमण हटवा; मात्र आधी पुनर्वसन करा’!

जन सम्राट टाईम्स



**मलकापूर। (प्रतिनिधी):** मलकापूर शहरातील राष्ट्रीय महामार्गालगतचे अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू होताच, या ठिकाणी वर्षानुवर्षे छोटे-मोठे व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या अनेक कुटुंबांसमोर उपजीविकेचे मोठे संकट उभे राहिले आहे. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला विरोध नसला, तरी कारवाईपूर्वी अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करून पर्यायी व्यवसायाची व्यवस्था करावी, अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मलकापूरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय महामार्गालगतचे अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू असून, ९ सप्टेंबर २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा तसेच संबंधित यंत्रणांच्या संयुक्त पथकाने कारवाईला सुरुवात केली, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

कारवाईला विरोध नाही; मात्र उदरनिर्वाहाचे काय? अतिक्रमणधारक प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका घेत असतानाच, अचानक व्यवसायाची जागा हटविल्यास त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. अनेक नागरिकांनी याच ठिकाणी अनेक वर्षांपासून छोटे-मोठे व्यवसाय उभारून आपल्या कुटुंबाचा संसार चालविला आहे. व्यवसायाची जागाच गेल्यानंतर “या कुटुंबांनी उदरनिर्वाह करायचा कसा?” असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे. ‘माणसांचा संसार उद्ध्वस्त करू नका’ अतिक्रमण हटाव मोहीम राबविताना प्रशासनाने केवळ कायदेशीर कारवाईवर भर न देता मानवी दृष्टिकोनातूनही विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देणे, व्यवसायासाठी आवश्यक व्यवस्था करणे तसेच पुनर्वसनाबाबत ठोस निर्णय घेणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे

## लंडनच्या संसदेत होणार भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवाचा जागर

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। प्रतिनिधी:** भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संविधानाच्या अमृतमहोत्सवाचा जागर आता भाराताबाहेर लंडनच्या संसदेत होणार आहे. बोधिसत्व फाऊंडेशन मुंबई, भारत आणि बीबीएमजी फाऊंडेशन, लंडन, यूके यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची माहिती बोधिसत्व फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कांबळे आणि बीबीएमजी फाऊंडेशन, लंडनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गौरव हंस यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. भारतासह विविध देशांतील मान्यवरांची उपस्थिती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला अर्पण केलेल्या भारतीय संविधानाला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमास भारत, जपान, कंबोडिया, थायलंड, लंडन, श्रीलंका, फ्रान्स आणि दक्षिण कोरिया येथील मंत्री, खासदार,



राजदूत, उद्योगपती तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. भारतामधूनही विविध केंद्रीय व राज्यस्तरीय मंत्री, खासदार आणि मान्यवरांना कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर विशेष नाट्यमय सादरीकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, सामाजिक आंदोलन, विचार, वारसा, दूरदृष्टी आणि ग्रंथसंपदा यांना समर्पित विशेष आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत लंडन आणि लीसेस्टर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित विशेष ‘थिएट्रिकल सादरीकरण’ करण्यात येणार आहे.

आंबेडकरांच्या विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा जागतिक पातळीवर प्रसार करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. लंडनच्या संसदेत ‘इंडो-यूके फ्री ट्रेड समिट’ या उपक्रमाचाच एक भाग म्हणून लंडन येथील संसदेत ‘इंडो-यूके फ्री ट्रेड समिट – Chapter 10’ चे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि यूकेमधील द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि व्यावसायिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने भारत व यूकेमधील प्रमुख उद्योगपती, उद्योजक आणि संबंधित क्षेत्रातील मान्यवर या परिषदेत सहभागी होणार आहेत. सामाजिक समानता आणि आर्थिक सहकार्यावर भर सामाजिक समानता, सांस्कृतिक देवाणघेवाण, आर्थिक सहकार्य तसेच भारत-यूके संबंध अधिक दृढ करणे ही या आंतरराष्ट्रीय उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

## लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा

### विहित मुदतीत सेवा देण्याच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांच्या सक्त सूचना

जन सम्राट टाईम्स



**पारोळा। प्रतिनिधी:** नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा विहित मुदतीत, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देणे हा लोकसेवा हक्क कायद्याचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे सर्व विभागांनी नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी समन्वयाने आणि सकारात्मक दृष्टिकोनातून काम करून या कायद्याची योग्य व प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सक्त सूचना राज्य लोकसेवा हक्क आयोग, नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिल्या.

आयुक्त चित्रा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील प्रशासकीय कामकाज तसेच लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अर्जातील त्रुटी वेळेत कळवा आयुक्त चित्रा कुलकर्णी म्हणाल्या की, सर्व विभागांनी सेवा हक्क कायद्याच्या कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा.

कायद्यातील सर्व तरतुदींचा अभ्यास करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. नागरिकांच्या अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास त्याबाबत अर्जदारांना वेळेत अवगत करावे. परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर विहित मुदतीत कार्यवाही करून नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नागरिकांनी विविध शासकीय सेवा मिळण्यासाठी केलेले अर्ज प्रलंबित ठेवू नयेत. विभागप्रमुखांनी अर्ज तसेच अपील अर्जांचा नियमित आढावा घेऊन ते विहित मुदतीत निकाली काढावेत, तसेच अपील अर्जांच्या बाबतीत विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. प्रशासनाच्या कामकाजाचे कौतुक लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याचे निर्देश देतानाच विविध विभागप्रमुखांनी मांडलेल्या अडचणींवर आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. जळगाव जिल्ह्यात लोकसेवा हक्क कायद्याच्या संदर्भातील कामकाज उत्कृष्ट पद्धतीने सुरू असल्याबद्दल त्यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. जिल्ह्यात ३८ विभागांच्या १,२१२ सेवा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा सादर केला. यावेळी त्यांनी सेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सुरू असलेल्या ‘सेवादूत’ प्रणाली आणि एआय आधारित नागरिक अभिप्राय प्रणालीबाबत माहिती दिली. जिल्ह्यात ३८ विभागांच्या १,२१२ प्रकारच्या सेवा सुरू असून, ‘आपले सरकार’ पोर्टल तसेच विविध ऑनलाइन सेवा प्रणालींच्या माध्यमातून नागरिकांना या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## येवती येथे बैलपोळा उत्साहात; सर्जा-राजाची पूजा!

जन सम्राट टाईम्स

**येवती, ता. बोदवड | प्रतिनिधी:** येवती येथे शेतकरी बांधवांचा जिव्हाळ्याचा आणि पारंपरिक बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाची विधिवत पूजा करून त्यांना आकर्षक पद्धतीने सजविले. बैलांना रंगरंगोटी करून, विविध पारंपरिक साहित्याने सजविण्यात आले. त्यानंतर सजविलेल्या बैलांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शेतकरी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पूजा-अर्चा करून नैवेद्य बैलपोळ्यानिमित्त गावातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण होते. पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा-अर्चा करण्यात आली. त्यांना नैवेद्य दाखवून वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या सोहळ्यासाठी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. बैलांच्या सजावटीमुळे आणि मिरवणुकीमुळे गावातील वातावरण उत्साहाने भारून गेले होते. शेतकरी-पशुधनातील जिव्हाळ्याचे नाते बैलपोळा हा केवळ पारंपरिक सण नसून शेतकरी आणि त्यांच्या पशुधनातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा सण आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा येवती ग्रामस्थांनी यंदाही उत्साहाने जपली. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे येवतीचा बैलपोळा सण पारंपरिक उत्साहात आणि आनंदात पार पडला.

# बांद्रा पूर्वेतील खेरनगर मनपा शाळेत शिक्षक दिन उत्साहात; विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा विशेष सत्कार

## इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांचे आयोजन; 'आमचे विद्यार्थी हेच आमचे खरे पुरस्कार'

जन सम्राट टाईम्स

**बांद्रा । प्रतिनिधी:** येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय राठोड होते. भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अर्चना सिंह यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन यावेळी शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. अर्चना सिंह यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले. आपल्या १३ वर्षांच्या अध्यापन अनुभवातून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. "शिक्षकी पेशा हा केवळ नोकरी नसून एक पवित्र जबाबदारी आहे. चांगले नागरिक घडवणे हेच आमचे खरे ध्येय आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. पाटील आणि खेत्री सरांचा विद्यार्थ्यांकडून विशेष सन्मान कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांचा केलेला सत्कार. श्री. विजयकुमार पाटील आणि श्री. लक्ष्मण खेत्री यांचा विद्यार्थ्यांनी विशेष सत्कार करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विजयकुमार पाटील सर आपल्या सोप्या आणि रंजक अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. अवघड विषयही ते सहज आणि सोप्या भाषेत समजावून सांगत असल्याने त्यांच्या तासाला विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळतो. तर लक्ष्मण खेत्री सर




हे विद्यार्थ्यांना नेहमी मदत करण्याच्या स्वभावामुळे आणि शिस्तप्रियतेमुळे विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक आहेत. अभ्यासात मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ते स्वतः वेळ देऊन मार्गदर्शन करतात. अभ्यासाबरोबरच खेळ आणि विविध उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम ते करतात. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना, "पाटील सर आणि खेत्री सर आम्हाला फक्त अभ्यासच नाही, तर जीवनाचे धडेही देतात. त्यांच्यामुळेच आमचे भविष्य उज्ज्वल होत आहे," अशी भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना स्वहस्ते तयार केलेली शुभेच्छापत्रे, पेन आणि पुस्तके भेट देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षिकांनीही विद्यार्थ्यांना दिले मार्गदर्शन यावेळी श्रीमती निकिता गवळी, श्रीमती नयना मोटघरे आणि कुमारी अमृता घाडगे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिक्षिका अभ्यासात मदत करण्यासोबतच विद्यार्थ्यांना नवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अवघड विषयही सहज समजतात, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. 'आमचे विद्यार्थी हेच आमचे खरे पुरस्कार' मुख्याध्यापक श्री. संजय राठोड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेला आदर पाहून शिक्षकवृंद भारावून गेल्याचे सांगितले. "आमचे विद्यार्थी हेच आमचे खरे पुरस्कार आहेत," असे भावनिक उद्गार त्यांनी यावेळी काढले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक संजय राठोड, ज्येष्ठ शिक्षिका अर्चना सिंह, शिक्षक विजयकुमार पाटील, लक्ष्मण खेत्री, तसेच निकिता गवळी, नयना मोटघरे, अमृता घाडगे यांच्यासह शाळेतील इतर शिक्षक व शिक्षिका आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थी प्रतिनिधीने केले. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सामूहिक छायाचित्र घेऊन शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची उत्साहात सांगता करण्यात आली.

# कुलदीप जाधवची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत निवड!

जन सम्राट टाईम्स




**सोयगाव। प्रतिनिधी:** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील माळेगाव पिंपरी येथील विद्यार्थी कु. कुलदीप किरण जाधव याने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेत आपल्या गावासह शाळेचे आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. जळगाव येथे आयोजित श्रीमती कांताबाई जैन स्मृती राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कुलदीपने आपल्या शाळेचे व तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. राज्यभरातून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत कुलदीपची निवड होणे ही सोयगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. गरुड विद्यालय, शेंदुर्णी येथे शिक्षण कुलदीप जाधव हा मूळचा माळेगाव पिंपरी येथील असून, सध्या तो गरुड विद्यालय, शेंदुर्णी येथे शिक्षण घेत आहे. अभ्यासासोबतच वक्तृत्व क्षेत्रात त्याने निर्माण केलेली ओळख कौतुकास्पद ठरत आहे. त्याच्या या यशामुळे माळेगाव पिंपरी गावासह सोयगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षक आणि पालकांचे मार्गदर्शन कुलदीपच्या या यशामागे त्याचे शिक्षक आणि पालक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. वक्तृत्व कलेत अशीच उल्लेखनीय कामगिरी करत त्याने भविष्यातही आपल्या गावाचे, शाळेचे आणि तालुक्याचे नाव अधिक उंचवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कुलदीप जाधवच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक व वक्तृत्व क्षेत्रातील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

जन सम्राट टाईम्स — सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# डोंगराळे गावातील व्यायामशाळा धूळखात

## तरुणांची दुरुस्ती व साहित्याची मागणी



जन सम्राट टाईम्स

**मालेगाव | प्रतिनिधी:** डोंगराळे गावातील व्यायामशाळांची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या व्यायामशाळा अक्षरशः धूळखात पडल्या आहेत. ग्रामीण भागातील तरुण आणि उदयोन्मुख खेळाडूंसाठी महत्त्वाच्या असलेल्या या सुविधांकडे तातडीने लक्ष देऊन व्यायामशाळांची दुरुस्ती करावी तसेच आवश्यक व्यायाम साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी स्थानिक क्रीडाप्रेमींनी केली आहे. समाधान सोनवणे, संतोष ठाकरे, भरत गायकवाड, विजय भोई, गणेश चिते आणि आशिष परदेशी यांनी याबाबत क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच स्थानिक प्रशासनाकडे मागणी केली आहे. छत गळते, भिंतींना तडे दुरुस्तीअभावी व्यायामशाळांच्या इमारतींची अवस्था बिकट झाली आहे. छत गळत असून भिंतींना तडे गेले आहेत. अनेक ठिकाणी आवश्यक व्यायाम साहित्य उपलब्ध नसल्याने तरुणांना सरावासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. डोंगराळे परिसरातील अनेक तरुण पोलीस भरती, लष्कर भरती तसेच विविध क्रीडा स्पर्धांची तयारी करीत आहेत. मात्र व्यायामशाळांची दुरवस्था आणि सुविधांचा अभाव असल्याने त्यांना उघड्यावर किंवा इतर ठिकाणी जाऊन सराव करावा लागत आहे. शासनाच्या विविध योजनांतून निधी उपलब्ध होण्याची शक्यता ग्रामीण भागातील क्रीडा सुविधांचा विकास करण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा आधार घेऊन या व्यायामशाळांचा कायापालट करता येऊ शकतो. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विकास निधीसह जिल्हा वार्षिक योजनेतील क्रीडा निधी आणि ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून क्रीडा सुविधांसाठी तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. व्यायामशाळांची दुरुस्ती करून आधुनिक साहित्य उपलब्ध झाल्यास ग्रामीण भागातील तरुणांना नियमित सरावासाठी मोठी सुविधा मिळणार आहे. यामुळे क्रीडा क्षेत्रात नव्या प्रतिभांना संधी मिळण्यासोबतच पोलीस आणि लष्कर भरतीची तयारी करणाऱ्या युवकांनाही त्याचा मोठा फायदा होणार आहे.' तातडीने निधी द्या, क्रीडा विभाग आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातील तरुणांनी केली आहे. व्यायामशाळांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करून आवश्यक व्यायाम साहित्य उपलब्ध करून न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तरुणांनी दिला आहे. ग्रामीण भागातील युवकांच्या आरोग्य आणि भवितव्याशी संबंधित हा प्रश्न असल्याने प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कार्यवाही करावी, अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पाच दिवस आधीच 'एसबीएमएमच्या राजा'चे आगमन

## महापौरांच्या हस्ते मुखदर्शनाचे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** मंडळाचे अध्यक्ष मिलिंद आवटे मुंबई-पुण्याच्या धर्तीवर आता धुळ्यातही मोठ्या गणरायाच्या मूर्तींचे गणेश चतुर्थीपूर्वीच आगमन होऊ लागले आहे. गणेशोत्सवाच्या दिवशी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाला सहकार्य म्हणून धुळ्यातील साईबाबा मुंज्या मारुती मंडळाच्या १६ फुटी गणरायाचा भव्य आगमन सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात महापौर मायादेवी परदेशी यांच्या हस्ते गणरायाच्या मुखदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मंडळाचे अध्यक्ष मिलिंद आवटे यांनी, "आमचा बाप्पा कुठल्याही स्पर्धेसाठी नव्हे, तर श्रद्धेसाठी आहे," अशी भावना व्यक्त केली. तर विकी परदेशी यांनी यंदा भरपूर पाऊस पडावा आणि सर्वांना निरोगी आरोग्य लाभावे, अशी बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली. नंदुरबारहून आणली १६ फुटी भव्य मूर्ती साईबाबा मुंज्या मारुती मंडळाचे यंदा नववे वर्ष असून, दरवर्षी आकर्षक आणि भव्य गणरायाच्या मूर्तीची स्थापना करण्याची मंडळाची परंपरा आहे. यंदा मंडळाने नंदुरबार येथून सिंहासनावर आरूढ असलेली तब्बल १६ फुटी गणरायाची भव्य मूर्ती आणली आहे.

गणरायाची लक्षवेधी मूर्ती पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत गणेशभक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. जयघोषाने आग्रा रोड परिसरात भक्तिमय वातावरण जुन्या मनपा कार्यालयापासून गणरायाच्या आगमन मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, गणरायाचा जयघोष आणि भक्तांचा उत्साह यामुळे आग्रा रोड परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गणेश चतुर्थीच्या पाच दिवस आधीच हा आगमन सोहळा आयोजित करण्यात आला. प्रशासनाला सहकार्य करण्याच्या मंडळाच्या या उपक्रमाचे नागरिकांकडूनही कौतुक होत आहे. जुन्या मनपापासून सुरू झालेली भव्य आगमन मिरवणूक शासकीय दूध डेअरी परिसरातील कोळवले नगर येथे उत्साहात संपन्न झाली. मान्यवरांसह शेकडो गणेशभक्तांची उपस्थिती या आगमन सोहळ्यास महापौर मायादेवी परदेशी, भाजपा पदाधिकारी तथा युवानेते विकी परदेशी, मंडळाचे अध्यक्ष मिलिंद आवटे, नगरसेविका चित्रलेखा परदेशी, महादेव परदेशी, संतोष परदेशी, राकेश पाटील यांच्यासह मंडळाचे शेकडो कार्यकर्ते आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हर हर महादेव'च्या गजराने त्रिकालेश्वर मंदिर दुमदुमले

## श्रीराम सेना फाउंडेशनतर्फे भव्य महाप्रसादाचे आयोजन

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** पवित्र श्रावण महिन्याच्या शेवटच्या दिवशी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने शहरातील साईप्रसाद कॉलनी येथील त्रिकालेश्वर महादेव मंदिर परिसर भक्तिमय झाला. श्रावणाच्या सांगतेनिमित्त महादेवाच्या दर्शनासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती. श्रीराम सेना फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विकी गोयर आणि सामाजिक कार्यकर्ते सागर परदेशी यांच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते महादेवाची महाआरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाला सुरुवात झाली. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. 'प्रति अमरनाथ' देखाव्याने वेधले लक्ष यंदाच्या आयोजनाचे विशेष आकर्षण ठरले ते 'प्रति अमरनाथ'च्या देखाव्याचे. अमरनाथच्या पवित्र वातावरणाची अनुभूती देणाऱ्या या देखाव्याने भोलेभक्तांचे विशेष लक्ष वेधून घेतले. देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. श्रावण महिन्याला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असून, या काळात भगवान महादेवाच्या उपासनेला विशेष स्थान आहे. त्यामुळे श्रावणाच्या शेवटच्या दिवशी त्रिकालेश्वर महादेव मंदिरात दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. भजन, जयघोषाने परिसर झाला भक्तिमय 'हर हर महादेव'च्या जयघोषासह महादेवाच्या भक्तिगीतांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी मनोभावे महादेवाचे दर्शन घेतले आणि त्यानंतर महाप्रसादाचा लाभ घेतला. श्रीराम सेनेचे उत्कृष्ट नियोजन, 'प्रति अमरनाथ'चा आकर्षक देखावा आणि भोलेभक्तांची मोठी उपस्थिती यामुळे मंदिर परिसराला भक्तिमय आणि उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. आयोजनाचे नियोजन आणि व्यवस्थेबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले. मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती या प्रसंगी भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, श्रीराम सेनेचे संस्थापक अध्यक्ष विकी गोयर, सागर परदेशी, प्रसिद्ध उद्योजक पराग अहिरे, बबन थोरात, किरण जोंधळे, विकी परदेशी, नगरसेवक रोहित चांदोडे, पापा गोयर, आकाश परदेशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि असंख्य शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आईच्या त्याग, ममतेला आणि संस्कारांना भावपूर्ण अभिवादन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव ग्रामीण । प्रतिनिधी:** मातेला अनन्यसाधारण महत्त्व असून, 'मातृदेवो भव' या भावनेतून आईला देवतास्वरूप मानले जाते. मातृत्व, माया, त्याग आणि वात्सल्याची आठवण करून देणारा हा पवित्र दिवस आईच्या निःस्वार्थ प्रेमाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देतो. आई म्हणजे प्रेम, माया, त्याग आणि संस्कारांचे मूर्तिमंत रूप. मुलांच्या सुखात स्वतःचे सुख मानणारी, संकटाच्या काळात खंबीरपणे साथ देणारी आणि पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्यभर झटणारी आई ही प्रत्येकाच्या जीवनातील पहिली गुरु असते. जन्म देण्यापासून ते जीवनाला योग्य दिशा देण्यापर्यंत आईची भूमिका अतुलनीय आहे. वीरमातांच्या संस्कारांनी घडला इतिहास भारतीय संस्कृती आणि इतिहासात अनेक मातांनी आपल्या संस्कारांनी आणि कर्तृत्वाने इतिहास घडविला. वीरमाता जिजाबाई आणि राणी लक्ष्मीबाई यांसारख्या मातांनी आपल्या कर्तृत्वाने मातृत्वाची ताकद जगासमोर अधोरेखित केली. देवकी असो वा यशोदा, आईच्या मायेचे, वात्सल्याचे आणि त्यागाचे स्वरूप सदैव पवित्रच राहिले आहे. तसेच पिठाचे दिवे प्रज्वलित करून चौसष्ट योगिनींची पूजा करण्याची परंपराही आहे. या धार्मिक परंपरांमागे आई आणि मुलांमधील प्रेम, जिव्हाळा आणि अतूट नाते अधिक दृढ करण्याची भावना आहे. आपल्या पाल्यांच्या सुख-समृद्धीसाठी आणि निरोगी आयुष्यासाठी आई श्रद्धेने प्रार्थना करते. आईचे उपकार फेडणे अशक्य आईचे उपकार एका जन्मात फेडणे अशक्य आहे. तिचे निःस्वार्थ प्रेम ही जगातील सर्वात अनमोल संपत्ती आहे. त्यामुळे पिठोरी अमावस्येच्या या पवित्र दिनानिमित्त घरोघरी परमेश्वरी रूपात वावरणाऱ्या सर्व मातांना मनःपूर्वक वंदन आणि साष्टांग दंडवत. "गोड तुझ्या त्या स्वप्नामधली, दाखव मजला तुझी माऊली..." आईच्या मायेची, त्यागाची आणि वात्सल्याची आठवण करून देणाऱ्या या भावपूर्ण दिवसानिमित्त प्रत्येकाने आपल्या आईप्रती कृतज्ञता व्यक्त करावी आणि तिच्या चरणी नतमस्तक व्हावे, हाच पिठोरी अमावस्येचा खरा संदेश आहे.

# सिरसोलीच्या जिल्हा परिषद शाळेत 'तान्हा पोळा' उत्साहात

## चिमुकल्यांच्या नंदी बैल सजावटीने वेधले लक्ष



जन सम्राट टाईम्स

**नागपूर| प्रतिनिधी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिरसोली येथे पारंपरिक 'तान्हा पोळा' सण मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. तान्हा पोळ्यानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सोहळ्याची रंगत वाढवली.

आकर्षकनंदीबैलसजावटीनेवेधलेलक्ष तान्हा पोळ्यानिमित्त विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले आणि आकर्षक पद्धतीने सजवून आणलेले नंदी बैल हे सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले. विविध रंग, सजावट आणि कल्पकतेचा वापर करून चिमुकल्यांनी तयार केलेल्या नंदी बैलांनी उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि क्रीडागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी संगीत खुर्ची, चमचा-गोळी यांसारख्या मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विजेत्यांचा पारितोषिक देऊन गौरव विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांसह उत्कृष्ट नंदी बैल सजावट करणाऱ्या चिमुकल्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. बक्षिसे मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला.

शिक्षक, समिती पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका उके मॅडम, शिक्षक डोंगरे सर व नागपूर सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशिष मालापुरे, उपाध्यक्ष रविना सपाटे तसेच विशेष उपस्थिती म्हणून संजय देशमुख उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना तान्हा पोळ्याच्या शुभेच्छा देत त्यांच्या कल्पकतेचे, कलागुणांचे आणि क्रीडागुणांचे भरभरून कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सिरसोली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील तान्हा पोळा सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिरसोली येथे पारंपरिक 'तान्हा पोळा' सण मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. तान्हा पोळ्यानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सोहळ्याची रंगत वाढवली.

# नशिराबादमध्ये पोळ्यानिमित्त बैलांच्या शर्यतीचा थरार रंगला

## सजावट स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, बैलजोडी सजावट स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी:** महाराष्ट्राचा पारंपरिक आणि शेतकरी बांधवांच्या जिव्हाळ्याचा सण असलेल्या पोळ्यानिमित्त नशिराबाद येथे वर्षानुवर्षे जपली जाणारी बैलांच्या शर्यतीची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि दणक्यात पार पडली. रोमांचक झालेल्या या शर्यतीत परिसरातील तब्बल ५० बैलजोड्यांनी सहभाग नोंदवला. सकाळी ठीक ११.३० वाजता दिगंबर जीवराम रोटे यांनी बंदुकीचा बार उडवून शर्यतीचा अधिकृत शुभारंभ केला. बार उडताच बैलजोड्यांनी गावाच्या मुख्य द्वाराच्या दिशेने घेतलेले दमदार प्रस्थान आणि उपस्थित शौकिनांचा जल्लोष यामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले. अतिशय चुरशीच्या झालेल्या शर्यतीत दीपक भालचंद्र बोंडे आणि विपुल बाळकृष्ण नारखेडे यांच्या बैलजोड्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला.

शर्यतीचा थरार अनुभवण्यासाठी तसेच आपल्या लाडक्या बैलांचे बळ आणि वेग पाहण्यासाठी ग्रामस्थांसह परिसरातील शौकिनांनी मोठी गर्दी केली होती. बैलजोडी सजावट स्पर्धेत किशोर पाटील अव्वल बैलांच्या शर्यतीसोबतच नशिराबाद नगरपरिषदेच्या वतीने बैलजोडी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेलाही शेतकरी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास ४० बैलजोड्या पारंपरिक आणि आकर्षक सजावटीसह सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेचे परीक्षण पशुधन विकास अधिकारी डॉ. विकास इंगळे आणि राधिका इंगळे यांनी केले. त्यांना प्रा. डॉ. विश्वनाथ महाजन आणि प्रा. प्रवीण महाजन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेश पाटील आणि धनश्री ॲग्रोचे मालक चंदू दादा भोळे यांच्या वतीने विशेष प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. नशिराबाद पेठ येथील लोकेश पाटील आणि हर्षल पाटील यांच्या बैलजोडीने हे प्रोत्साहनपर बक्षीस पटकावले. सहभागी सर्वच बैलजोड्यांच्या आकर्षक आणि पारंपरिक सजावटीने उपस्थितांची मने जिंकली. प्रशासनासह पोलिसांचे प्रभावी नियोजन हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी नशिराबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील, प्रभारी नगराध्यक्ष पंकज महाजन, सभापती कीर्तीकांत चौबे, विनोद रंधे, किरण पाटील, विकास धनगर, चेतन बऱ्हाटे, सचिन महाजन, पराग नारखेडे आणि दिगंबर जीवराम रोटे यांच्यासह विविध पदाधिकारी, नगरसेवक, विविध सोसायट्यांचे चेअरमन तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शर्यतीचा थरार पाहण्यासाठी झालेली प्रचंड गर्दी लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी नशिराबादच्या सहायक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे आणि नशिराबाद पोलिसांचे मोलाचे सहकार्य लाभले. पोळ्याच्या निमित्ताने बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच पारंपरिक शर्यत आणि सजावट स्पर्धेच्या माध्यमातून नशिराबादकरांनी आपल्या सांस्कृतिक परंपरेचा गोडवा आणि उत्साह कायम ठेवला.